पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी- ४११ ०१८.

**मा. शिक्षण समिती**

कार्यपत्रिका क्रमांक - ११

**सभावृत्तांत**

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.शिक्षण समितीची पाक्षिक सभा **गुरुवार** दिनांक ०५**/०८/२०२१** रोजी दुपारी **२.००** वाजता महापालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील मा.सभापती शिक्षण समिती यांचे दालनात मा.उपसचिव महाराष्ट्र शासन यांचेकडील पत्र क्र.कोरोना/२०२०/प्र.क्र.७६/नवि-१४ दि.०३ जुलै २०२० व २८ जून २०२१ अन्वये ऑनलाईन पध्दतीने (व्हिडिओ कॉन्फरन्सिंग द्वारे) आयोजित करणेत आली होती. सदर सभेत खालीलप्रमाणे सन्मा.सदस्य सभागृहात उपस्थित होते.

१. **मा. पवार मनिषा प्रमोद - सभापती**
२. मा.सारीका शिवाजी सस्ते
३. मा.बारसे प्रियांका प्रविण
४. मा.काटे स्वाती(माई)चंद्रकांत

या शिवाय मा.उल्हास जगताप - नगरसचिव, मा.संदिप खोत - उप आयुक्त (प्राथमिक शिक्षण विभाग) हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

---------

**उपस्थित सन्मा.सदस्यांचे संमतीने खालील विषय सभा कामकाजामध्ये दाखल करुन घेणेत आले.**

विषय क्र.१) पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या सर्व प्राथमिक शाळेतील इ. ३ री ते इ. ७ वी तील विद्यार्थांना सुंदर हस्ताक्षर करिता “मे.स्पार्कल क्लासेस” यांच्या मार्फत सुंदर माझे अक्षर हे पुस्तक थेट पद्धतीने खरेदी करणेबाबत - मा. मनिषा पवार मा.सारीका सस्ते, यांचा प्रस्ताव.

विषय क्र.२) सन २०२१-२२ करिता मनपा शाळेतील विद्यार्थांकारिता शालेय पुस्तके थेट पद्धतीने देण्याबाबत. मा. मनिषा पवार, मा.सारीका सस्ते, यांचा प्रस्ताव.

----------

खालील प्रमाणे सुचना मांडण्यात आली.

सुचक - मा. स्वाती काटे अनुमोदक - मा.सारीका सस्ते

पिंपरी चिंचवड महानगरपालिका माशिक्षण समिती सभा (कार्यपत्रिका क्र.११) दिनांक- ०९/०८/२०२१ रोजी दुपारी ०२:०० वा. पर्यंत तहकूब करण्यात यावी.

सदर सुचना सर्वानुमते मान्य झाली.

---------

सभापती - सोमवार दिनांक ०९/०८/२०२१ रोजी दुपारी ०२:०० वा पर्यंत सदरची सभा तहकूब करण्यात येत आहे.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८.

**मा. शिक्षण समिती**

कार्यपत्रिका क्रमांक - ११

**सभावृतांत**

**(दिनांक - ०५/०८/२०२१ ची तहकूब सभा)**

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.शिक्षण समितीची पाक्षिक सभा सोम**वार** दिनांक **०९/०८/२०२१** रोजी दुपारी **२.००** वाजता महापालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील मा.सभापती शिक्षण समिती यांचे दालनात मा.उपसचिव महाराष्ट्र शासन यांचेकडील पत्र क्र.कोरोना/२०२०/प्र.क्र.७६/नवि-१४ दि.०३ जुलै २०२० व २८ जून २०२१ अन्वये ऑनलाईन पध्दतीने (व्हिडिओ कॉन्फरन्सिंग द्वारे) आयोजित करणेत आली होती. सदर सभेत खालीलप्रमाणे सन्मा.सदस्य सभागृहात उपस्थित होते.

**१ मा. पवार मनिषा प्रमोद - सभापती**

२ मा.सारीका शिवाजी सस्ते

३ मा.बारसे प्रियांका प्रविण

४ मा.वाघमारे अश्विनी विक्रम

या शिवाय मा.उल्हास जगताप - नगरसचिव, मा.ज्योत्सना शिंदे - प्रशासन अधिकारी (प्राथमिक शिक्षण विभाग) हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

दि. २०/०७/२०२१ रोजी झालेल्या सभेचा ( कार्यपत्रिका क्रमांक - १०) चा सभावृतांत कायम करण्यात आलेचे मा.सभापती यांनी प्रकट केले.

---------

ठराव क्रमांक - ५३ विषय क्रमांक - ०१

दिनांक - ०९/०८/२०२१

सुचक : मा.मनिषा पवार अनुमोदक : मा.सारीका सस्ते

संदर्भ : मा.मनिषा पवार, मा.सारिका सस्ते, यांचा प्रस्ताव.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका सर्व प्राथमिक शाळांमध्ये बहुतेक शिक्षण घेणारे विद्यार्थी हे गरीब परिस्थितीतून येत असतात. आपल्या महानगरपालिकेतील शाळेचा दर्जा खाजगी शाळेच्याप्रमाणे करण्यासाठी, विद्यार्थांमध्येही आपल्या शाळेविषयी आवड निर्माण होण्याकरिता तसेच मनपा शाळेतील विद्यार्थामध्ये शैक्षणिक गुणवत्ता वाढ करण्याकरिता व आपल्या मनपा शाळांची पटसंख्या वाढण्याकरिता शिक्षण समिती प्रयत्न करीत आहे. त्याच अनुषंगाने पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या सर्व प्राथमिक शाळेतील विद्यार्थीचे हस्ताक्षर सुंदर होणेकरिता “मे.स्पार्कल क्लासेस” यांच्यामार्फत सुंदर माझे अक्षर हे पुस्तक खरेदी करणेबाबत प्रस्ताव कार्यालयास सादर केलेला आहे. सदरच्या एका पुस्तकाची किमत र.रु. ९८/- आहे. तरी पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या सर्व प्राथमिक शाळेतील इ. ३ री ते इ. ७ वी तील विद्यार्थांना सुंदर हस्ताक्षर करिता “मे.स्पार्कल क्लासेस” यांच्यामार्फत सुंदर माझे अक्षर हे पुस्तक थेट पद्धतीने खरेदी

करण्यास.व त्यासाठी येणाऱ्या प्रत्यक्ष खर्चास मान्यतेसाठी मा.स्थायी समिती सभेकडे शिफारस करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - ५४ विषय क्रमांक - ०२

दिनांक - ०९/०८/२०२१

सुचक : मा.मनिषा पवार अनुमोदक : मा.सारीका सस्ते

संदर्भ : मा.मनिषा पवार, मा.सारिका सस्ते, यांचा प्रस्ताव.

कोरोना प्रादुर्भावामुळे (विद्यार्थ्यांचे) दोन वर्ष परीक्षा झाल्या नसून दोन इयत्ता एकत्र करून 45 दिवसांचा अभ्यासक्रम एकत्र दिला आहे. त्या अभ्यासक्रमावर आधारित १५ दिवसांनी १ याप्रमाणे ३ पेपर सोडवायचे असतात. त्याचा रिपोर्ट शिक्षण विभागाला(खात्याला) सादर करणे गरजेचे आहे.सदर अभ्यासक्रमाची पुस्तके ऑनलाइन उपलबध आहेत परंतु विद्यार्थांकडे सोयी सुविधा नसल्याने त्यामुळे विद्यार्थांना अभ्यास करणे अवघड जात आहे .विद्यार्थ्यांना व त्यांच्या पालकांना अथवा शिक्षकांना त्या पुस्तकांची झेरॉक्स काढावी लागत आहदरचा खर्च विद्यार्थी व पालकाना करणे शक्य नसल्याने अडचणीचे जात आहे व ते त्यांना सोयीचे होत नाही .त्यामुळे सदरचा खर्च प्राथमिक व माध्यमिक शिक्षण विभाग मनपातर्फे करण्यात यावा. विद्यार्थ्यांना व त्यांच्या पालकांना अथवा शिक्षकांना सदरची पुस्तके हाताळणे सोपे जावे व कमी खर्चात उपलब्ध व्हावे म्हणून हा उपक्रम महानगरपालिका शिक्षण विभागाने राबवून विद्यार्थ्यांना सदर पुस्तके उपलब्ध करून त्वरित देण्यात यावी. सदर प्रक्रिया वेळेमध्ये होण्यासाठी वर्षा कॉर्पोरेट धनकवडी पुणे यांचे मार्फत थेट पद्धतीने खरेदी करून घेण्यात यावे. तसेच इयत्ता २ री ,३ री ,४ थी साठी ए / फोर साईज)A4 Size), दर ५५ पैसे प्रति पान आणि इयत्ता ५ वी ,६ वी ,७ वी ,८ वी ,९ वी १० , वी साठी १/A सेमी साईज) 1/A cm Size) ४५ पैसे प्रती पानानुसार बायंडिंग करून त्वरित उपलब्ध करावी. विद्यार्थ्यांचे वेळेचे व शैक्षणिक नुकसान होणार नाही याची काळजी घ्यावी सदर विषय वित्तीय मान्यतेसाठी मा.स्थायी समितीकडे शिफारस करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

यानंतर मा.सभापती यांनी सभा संपल्याचे जाहिर केले.

( पवार मनिषा प्रमोद )
सभापती
शिक्षण समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी १८. नगरसचिव कार्यालय
क्रमांक : नस/४/कावि/ ३८१/२०२१
दिनांक : ०९/०८/२०२१

**(उल्हास बबनराव जगताप)**
**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

प्रत : सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांचेकडे पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.